वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण,संस्था,
व्ही.आय.पी.रोड, धरमपेठ, नागपूर-४४००१०

Email-sameti१२३@yahoo.co.in Phone-०७१२ २५५५९९९,२५४१९४४

---

जाक्र/वनामती/आस्था/से.नि./सिव्हील/नामिकासुची/३८९ /२०२५ दिनांक १२/ ०२ /२०२५

## जाहीरात

(वनामती अंतर्गत विवक्षित कामासाठी नामिकासुची करणेबाबत)

वनामती आणि अधिनस्त सर्व रामेती संस्थेचे परिसरातील इमारतींचे बांधकाम/दुरुस्ती/देखभाल व व्यवस्थापन या विवक्षित कामासाठी एम्पॅनेल तयार करावयाचे असुन त्यासाठी महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंता वर्ग-२ सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे. विविक्षित कामासाठी निवड केलेल्या उमेदवारांना परिश्रमीक तथा इतर शर्ती व अटी सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.संकिर्ण-२७१५/प्रक्र १००/१३ दिनांक १७.१२.२०१६ नुसार लागु राहतील.

१.नामिकासुचि मधील सेवानिवृत्त अभियंता वर्ग-२ यांचे विवक्षित कामासाठी नियुक्तीच्या कालावधीत कर्तव्ये व जबाबदाऱ्या पुढिलप्रमाणे राहतील.

१) वनामती आणि अधिनस्त सर्व रामेती संस्थेचे परिसरातील इमारतींचे बांधकाम/ दुरूस्ती / देखभाल व व्यवस्थापन संबंधी सर्व कामे

२) आवश्यकतेनुसार वनामती अंतर्गत महा.शासनाचे सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका व बांधकाम/दुरूस्ती व परिरक्षण संबंधी सर्व प्रचलित नियमासंबंधी आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देणे.

३) वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार वनामती/रामेती बांधकाम दुरूस्ती व्यवस्थापनासंबंधी कामे.

४) नामिकासुचीसाठी सा.बा. विभागातील अभियंता गट-अ (ग्रेड वेतन ७६००/- पेक्षा कमी) गट-ब(राजपत्रित व अराजपत्रित) पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा तसेच कमीत कमी अभियांत्रिकी (सिव्हिल) पदविका/पदवीधर असावा.

५)सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना उपरोक्त तरतुदीसोबत पुढील अटी व शर्ती लागू राहतील.

नामिकासूची मध्ये नावे समाविष्ठ असलेल्या उमेदवारापैकी संस्थेच्या निकडीनुसार प्रथमत: जास्तीत जास्त ११ महिन्याच्या कालावधीसाठी किंवा विवक्षित काम संपेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी नियुक्त करण्यात येईल.सामान्य प्रशासन विभाग,शासननिर्णय दिनांक १७.१२.२०१६ नुसार नामिकासूची वैधता ३ वर्ष असुन विवक्षित काम सुरू राहिल्यास संस्थेच्या निकडीनुसार वेळोवेळी पुनश्च: नामिकासूचीतुन नियुक्ती करण्यात येईल.

२. सक्षम प्राधिकारी यांना कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या नियुक्ती आणि सेवा समाप्ती बाबतचे अधिकारी राहतील.

३. सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना अदा करावयाचे मासिक परिश्रामिक सामान्य प्रशासन विभाग शासननिर्णय दिनांक १७.१२.२०१६ नुसार अदा करण्यात येईल.

४. उपरोक्त शासननिर्णय दिनांक १७.१२.२०१६ नुसार अर्ज करतेवेळी उमेदवाराचे वय ६५ वर्षाचे आत असावे.

५. विवक्षित कामासाठी अर्ज करणारा उमेदवार शारिरिक व मानसिक आरोग्याच्या दृष्टिने सक्षम असावा तसेच विवक्षित कामाकरिता त्यांचेकडे आवश्यक क्षमता असावी.

६.विवक्षित कामासाठी नियुक्ती असल्याने संबंधीतास नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क असणार नाही.

७.विवक्षित कामासाठी नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती,सोवविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

८.विवक्षित कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध(Conflict of Interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

९.इच्छुक उमेदवारांनी साध्या (ए४ साईज) कागदावर सोबत जोडलेल्या विहीत नमुण्यात अर्ज करावा.

१०.अर्जाचे लिफाफयावर वनामती आणि अधिनस्त सर्व रामेती संस्थेचे परिसरातील इमारतींचे बांधकाम/दुरुस्ती/देखभाल व व्यवस्थापन या विवक्षित कामासाठी नामिकासुची मध्ये नावे समाविष्ट करणेबाबत अर्ज असे ठळक अक्षरात नमूद करावे. तसेच आवश्यक असलेले सर्व कागदपत्रे अर्जासोबत जोडावे.

११.अर्ज सादर करण्याचा अंतीम दिनांक 20/०२/२०२५ असुन सदर दिवशी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत अर्ज स्विकारण्यात येतील त्यानंतर आलेले अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही.पोस्टाने अर्ज पाठविल्यास झालेल्या विलंबास वनामती कार्यालय जबाबदार राहणार नाही.

७. प्राप्त अर्जाचे अनुषंगाने निवडीबाबत कार्यवाही करण्याचे संपुर्ण अधिकार वनामती संस्थेस असुन अर्ज नाकारला गेल्यास याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण/लेखी सुचना देण्यास संस्था बांधील राहणार नाही.

दिनांक -11/०२/२०२५

संचालक

वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन

प्रशिक्षण,संस्था,धरमपेठ,नागपूर

## अर्जाचा नमुना

**वनामती /रामेती अंतर्गत बांधकामे, दुरुस्ती, परिरक्षण या विवक्षित कामांसाठी नामिकासूची(एम्पॅनल) मध्ये नाव समाविष्ठ करणेबाबत अर्ज**

प्रती,

संचालक,
वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण,संस्था,
व्ही आय पी रोड, धरमपेठ, नागपूर-१०

महोदय,

वनामती संस्थेचे संकेतस्थळ/वर्तमान पत्रातील जाहिरात दि.---/०२/२०२५ चे अनुषंगाने **वनामती /रामेती अंतर्गत बांधकामे, दुरुस्ती, परिरक्षण या विवक्षित कामांसाठी** नामिकासूची(एम्पॅनल) मध्ये नाव समाविष्ठ करणेबाबत अर्ज सादर करीत असून आवश्यक विवरण खालीलप्रमाणे आहे.

१. पूर्ण नाव :- ----------------------------------------------------------

२. निवासी पत्ता :- ----------------------------------------------------------

----------------------------------------------------------

---------------------------मो.नं.---------------------------

३. शैक्षणिक पात्रता :- पदविका .......................

पदवी .......................

इतर .....................

४. जन्म दिनांक व दि.३१/०१/२०२५ रोजीचे वय :- .................. .....................

५. सेवा कालावधीत धारण केलेली पदनामे व सेवानिवृत्तीचे वेळी धारण केलेले पदनाम :- १)

२)

३)

६. एकूण सेवा कालावधी :- वर्ष ........ महिना .........

७. सेवा कालावधीत सरकारी कर्मचा-यांना प्रशिक्षण दिले असल्यास विवरण :---

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

८. सेवा कालवधीत शिस्तभंगाची कारवाई झाली होती काय ? होय/नाही

९. सेवानिवृत्तीचे दिवशीचे शेवटचे मासिक वेतन

१०. सेवानिवृत्ती वेतन(पीपीओ ची प्रत जोडावी)

११. आपण नमूद करु इच्छीत असल्यास सदर पदासाठी लाभदायक ठरेल अशी आपणाशी संबंधीत इतर माहिती किंवा विवरण

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

अर्जात नमुद केलेली माहिती योग्य असून संस्थेच्या जाहिरातीमध्ये नमुद विवक्षित कामाचे स्वरुप काळजीपूर्वक वाचले आहे. सदर कामे पार पाडण्यास मी सक्षम आहे.

दिनांक :

सहपत्रे :

दिनांक-

स्वाक्षरी